Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume-VIII, Issue-I
January - March - 2019
Marathi

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

Lecturer
Govt. College of Arts & Sc...
Aurangabad

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १२ | भारतातील अन्नसुरक्षितता आणि पोषण (Food Security and Nutrition in India)<br>**डॉ. राधेश्याम किसनराव राऊत** | ६८-७३ |
| १३ | अन्न सुरक्षितता<br>**सौ. कविता प्रल्हादराव हिरूळकर** | ७४-७९ |
| १४ | भारतातील अन्न सुरक्षितता: समस्या, कारणे आणि उपाय<br>**डॉ. विठ्ठल शंकरराव फुलारी** | ८०-८६ |
| १५ | भारतातील अन्नसुरक्षा आणि उपाय<br>**प्रा. डॉ. सुरेश त्रिं. सामाले** | ८७-९१ |
| १६ | भारत व जग आणि अन्न सुरक्षितता<br>**मारोती सदाशिव कदम** | ९२-९६ |
| १७ | महाराष्ट्रातील बदलती पीक रचना: एक दृष्टिक्षेप<br>**डॉ. वैशाली लक्ष्मीकांत देशमुख** | ९७-१०० |
| १८ | महाराष्ट्रातील मुख्य पीक क्षेत्रातील उत्पादनाच्या चर्चाअंतर्गत भविष्यकालीन योजनेच्या सुचना<br>**डॉ. मिनाक्षी निवृत्तीराव कोंगे** | १०१-१०४ |
| १९ | महाराष्ट्रातील कृषी भूमी उपयोजन व पीक संरचना<br>**प्रा. गणेश लोढे** | १०५-१०७ |
| २० | भारतीय कृषी आणि वित्तपुरवठा<br>**परमेश्वर सुभाषराव भुस्से** | १०८-११० |
| २१ | कृषि बाजार आणि किंमत: एक अभ्यास<br>**डॉ. कदम के. एस.** | १११-११२ |
| २२ | भारतीय कृषी मूल्य धोरण आणि कृषी मूल्य आयोग<br>**प्रा. डॉ. श्रीराम खाडे** | ११३-११६ |
| २३ | शेतमालाच्या किंमतीतील चढउताराची कारणे व परिणाम<br>**लोडे परमेश्वर लिंबाजी** | ११७-११९ |
| २४ | भारतीय शेतीच्या समस्या व उपाय एक अभ्यास<br>**प्रा. डॉ. होदलुरकर एन. व्ही.** | १२०-१२३ |




Govt. College of Arts & Science Aurangabad
Lecturer Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL Govt. College of Arts & Science Aurangabad

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# १७. महाराष्ट्रातील बदलती पीक रचनाः एक दृष्टिक्षेप

डॉ. वैशाली लक्ष्मीकांत देशमुख
सहा. प्राध्यापक, अर्थशास्त्र, शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद.

## १. प्रस्तावना

महाराष्ट्राची अर्थव्यवस्था कृषीप्रधान नाही असे आपण मानत असलो तरी आजही ६२% लोक कृषी व संबंधीत क्रियांवर आधारित आहेत. महाराष्ट्राची अन्नधान्याची उत्पादकता राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहे. लागवडीखालील निव्वळ क्षेत्राच्या बाबतीत महाराष्ट्राचा भारतात दुसरा क्रमांक आहे. परंतु सर्व पिकांची हेक्टरी उत्पादकता राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहे. शेती मोसमी पाण्यावर अवलंबून असल्याने आणि एकूण लागवडीखालील क्षेत्रापैकी फक्त १६% क्षेत्र ओलिताखालील असल्याने उत्पादकता कमी आहे. त्याचप्रमाणे मराठवाडा व विदर्भाचा मोठा भाग पावसाच्या अत्यल्प प्रमाणाचा आणि पर्जन्यछायेचा आहे आणि महत्वाचे म्हणजे महाराष्ट्राच्या शेतीचे वैशिष्ट्य, उद्दिष्ट बदलत आहे, ते म्हणजे बागायती, नगदी पिकांचे क्षेत्र वाढत जाऊन अन्नधान्य पिकांचे क्षेत्र घटत आहे.

महाराष्ट्राची पीक रचना विचारात घेता अन्नधान्य, तेलबिया, नगदीपिके अशांचा समावेश असलेला आहे. परंतु १९६०-६१ म्हणजे महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासून आतापर्यंत या पीकरचनेमध्ये मोठ्या प्रमाणात बदल झालेला आहे व हा बदल महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम करणारा आहे. प्रस्तुत निबंधामध्ये महाराष्ट्राच्या पीकरचनेमध्ये होत गेलेल्या बदलांचा व त्याच्या कारणांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

## २. महाराष्ट्राची स्थिती

महाराष्ट्राच्या पीकरचनेचा ढोबळ आढावा घेतल्यास ज्वारी, गहू, तांदूळ, बाजरी यासारखी अन्नधान्य पिके, ऊस, कापूस, तंबाखू, मिरची ही नगदी पिके तर भुईमुग, सोयाबीन, तीळ, जवस, मोहरी अशी विविध तेलबिया पिकेही घेतली जातात. त्याचप्रमाणे सध्या महाराष्ट्रात फुलशेती व फळशेतीचे प्रमाणही मोठ्या प्रमाणात वाढले आहे. परंतु याचे उत्पादन सिंचन सुविधा असणारे शेतकरीच जास्त प्रमाणात घेत आहेत.

महाराष्ट्राच्या राज्य उत्पान्नात शेती, उद्योग, सेवा या क्षेत्रांचा १९६०-६१ पासूनचा आढावा घेतल्यास भयानक वास्तव समोर येते. १९६०-६१ मध्ये राज्याचे स्थुल उत्पन्न रु.२२४९ कोटी होते. दरडोई उत्पन्न ५७६ रुपये होते. राज्य स्थुल उत्पन्नामध्ये कृषीचा वाटा २६%, उद्योग क्षेत्राचा २४.५८% तर सेवा क्षेत्राचा ४९.४०% होता, १९९०-९१ मध्ये कृषीचा राज्य उत्पन्नातील वाटा १८.८% एवढा झाला, २०१०-११ मध्ये तो १२.९३% तर २०१६-१७ मध्ये ११.४०% पर्यंत घटला, म्हणजे राज्याचे दरडोई उत्पन्न १९६०-६१ मध्ये रुपये ५७६ होते ते १९९०-९१ मध्ये रुपये ८८८१ झाले. नवीन आर्थिक धोरण स्विकारल्यानंतर १० वर्षांत राज्य दरडोई उत्पन्न २०००-०१ मध्ये ३.५% ने वाढून २८५४० रुपये झाले. २०१०-११ मध्ये दरडोई उत्पन्न ८४८५८ रुपये तर



Govt. College of Arts & Science Aurangabad
PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

२०१६-१७ मध्ये १,६५,४९१ रुपये वर पोहचले. दरडोई उत्पन्नाबाबतची ही गगनभरारी सेवा क्षेत्राच्या वाढत्या सहभागामुळे प्राप्त झाली आहे. कृषी क्षेत्राचा राज्य उत्पन्नामध्ये घटणारा वाटा शेतीच्या विकासातील अडथळे, मागासलेपणा सिध्द करतो. महाराष्ट्रावरील शेतीवर हे संकट वाढत जाणारे आहे हे यावरुन लक्षात येते. याचे एक महत्वाचे कारण स्पष्ट करता येते ते म्हणजे बदलत जाणारी पीक पध्दती होय. सर्व पिकांचा एकत्रित विचार केल्यास महाराष्ट्रात अन्नधान्य पिकांचे प्रमाण घटून नगदी पिकांचे उत्पादन वाढल्याचे दिसते. नगदी पिकांचे उत्पादन वाढण्यामध्ये श्रीमंत मोठे शेतकरी, सिंचन सुविधा असणारे शेतकरी जास्त आहेत. तर कोरडवाहू शेती, अल्पभूधारक, सिमांत शेतकरी मात्र अत्यंत हालाखीच्या स्थितीत लोटले जात आहेत असे भयानक वास्तव समोर येत आहे.

### ३. महाराष्ट्राची पीक रचना

एका विशिष्ट वेळी विविध पिकांखाली असलेल्या क्षेत्राचे प्रमाण म्हणजे पीकरचना होय. पीकरचनेवर ज्या-त्या प्रदेशातील प्राकृतीक, सांस्कृतीक, सामाजिक घटकांचा परिणाम होत असतो. महाराष्ट्रात खरीप व रब्बी असे पिकाचे दोन हंगाम आहेत. पीकरचनेमध्ये झालेला बदल पुढील प्रमाणे आहे.

**महाराष्ट्रातील प्रमुख पिकाखालील क्षेत्र (पीक रचना)** (एक हजार हेक्टरमध्ये)

| पिके / वर्ष | १९६०-६१ | १९८०-८१ | २०००-०१ | २०१०-११ | २०१६-१७ |
|---|---|---|---|---|---|
| सर्व तृणधान्य | १०६०६ (६०.५९) | १०९९६ (५९.८०) | ९८२४ (४५.८३) | ८९८५ (४१.५२) | ८४९० (३७.०७) |
| सर्व कडधान्य | २३४९ (१३.४२) | २७१५ (१४.७९) | ३५५७ (१८.०४) | ४०३८ (१८.६६) | ४३५८ (१९.०३) |
| सर्व अन्नधान्य | १२९५५ (७४.१४) | १३६९१ (७४.६०) | १३३८२ (६७.८८) | १३०२३ (६०.१९) | १२८४८ (५६.१०) |
| सर्व तेलबिया | १८६० (१०.६७) | १७८० (९.६९) | २५५९ (१२.९८) | ३६२८ (१६.७६) | ३५५२ (१८.५६) |
| नगदी पिके | २६८० (१५.३०) | २८८१ (१५.६९) | ३७७२ (१९.१३) | ४९८४ ([illegible]) | ५२५५ (२६.७१) |
| **एकूण क्षेत्र** | **१७४९५** | **१८३५२** | **१९७१२** | **२१६३५** | **२२९००** |

**स्त्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१७-१८** (कंसातील आकडे प्रतिशतमध्ये)

सर्व तृणधान्ये यामध्ये ज्वारी, तांदूळ, गहू, बाजरी व इतर तृणधान्ये येतात. सर्व कडधान्य म्हणजे तूर, हरबरा, मुग, उडीद व इतर तर सर्व तृणधान्य व सर्व कडधान्य यांना सर्व अन्नधान्य यात समाविष्ट केले जाते. नगदी पिकांमध्ये प्रामुख्याने ऊस, कापूस, तंबाखू यांचा समावेश आहे.

महाराष्ट्रातील एकूण पिकाखालील क्षेत्र वाढत आहे. परंतु तृणधान्य व कडधान्य या पिकाखालील क्षेत्र १९६०-६१ ते २०१६-१७ या काळात घटत असल्याचे दिसते. तेलबिया क्षेत्र १०.६७% वरुन १८.५६% पर्यंत वाढले. परंतु यामध्ये भुईमुगाचे क्षेत्र घटून सोयाबीन लागवड क्षेत्र वाढले आहे. नगदी पिकाखालील क्षेत्र १५.३०% वरुन २६.७१% पर्यंत वाढले आहे. महाराष्ट्रातील पिकाखालील क्षेत्रात मोठ्या प्रमाणात होणारा बदल यावरुन लक्षात येतो.



PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

पीक रचनेवर पिकांची उत्पादकता कशी आहे याचा परिणाम होतो. ज्या पिकांची उत्पादकता जास्त त्यानुसार पिकाची लागवड बदलत जाते, पिकांना मिळणारा भाव सुध्दा लागवड क्षेत्रावर परिणाम करतो. १९६०-६१ पासून प्रमुख पिकांची उत्पादकता कशी आहे. याचा आढावा घेतल्यास वस्तूस्थिती समोर येते.

**प्रमुख पिकांची उत्पादकता (हजार टन मध्ये)**

| वर्षे / पिके | १९६०-६१ | १९८०-८१ | २०००-०१ | २०१०-११ | २०१६-१७ |
|---|---|---|---|---|---|
| सर्व कडधान्ये | ६७५५ | ८६४७ | ८४९७ | १२३१७ | १२६४६ |
| सर्व अन्नधान्ये | ७७४४ | ९४७२ | १०१३४ | १५४१३ | १७२२९ |
| ऊस | १०४०४ | २३७०७ | ४९५६९ | ८५६९१ | ५४२३७ |
| कापूस | १६७३ | १२२४ | १८०९ | ७४७३ | १०७५५ |
| भुईमूग | ८०० | ४५१ | ४७० | ४७० | ४२० |
| सर्व डाळी | ९८९ | ८२५ | १६३७ | ३०९६ | ४५८४ |

**स्त्रोत : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१७-२०१८**

महाराष्ट्रात पिकांच्या उत्पादकतेमध्ये कडधान्य, अन्नधान्य यांची उत्पादकता दुप्पटीने वाढली. परंतू ऊसाची उत्पादकता पाच पट तर कापसाची उत्पादकता सहा पटीत वाढली आहे. तेलबियामध्ये भुईमुगाची उत्पादकता मात्र ५०% ने घटली. म्हणजेच नगदी पिकांची उत्पादकता मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसते याचे प्रमुख कारण हेच सांगता येईल की, अन्नधान्य पिके प्रामुख्याने कोरडवाहू, सिमांत शेतकऱ्यांकडून घेतली जातात. ज्यामध्ये सर्वच आदानांचे प्रमाण कमी असते तर नगदी पिके सिंचीत क्षेत्रामध्ये घेतली जात असून आदानांचे प्रमाण वाढल्याने उत्पादकता मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

नगदी पिकांचे लागवड क्षेत्रही वाढले आणि उत्पादकताही वाढली आहे. तसेच अन्नधान्य लागवडीचे प्रमाण घटले तर तेलबिया लागवडीचे प्रमाण वाढले असले तरी भुईमुगाची उत्पादकता घटली व सोयाबीनची वाढली आहे. महाराष्ट्राच्या पीकरचनेमध्ये झालेला हा बदल अनेकविध कारणांचा परिणाम आहे काही प्रमुख कारणे नमूद करणे गरजेचे आहे.

१) अन्नधान्य किंमतीमध्ये असणारी अनिश्चितता.

२) अन्नधान्य, तृणधान्य, कडधान्य यांच्यासाठी बाजारपेठेची उदासिनता, किंमतीबाबत शासनाचे उदासिन धोरण.

३) नगदी पिकांना मिळणारा हमीभाव जास्त असल्याने व शासनाच्या योजनांचा लाभही जास्त असल्याने नगदी पिकांची लागवड वाढली.

४) कृषी उत्पादकांची एकजूट, सहकार्य हे नगदी पिकांबाबत जास्त आढळते.

५) वाढत्या सिंचन सुविधांचा लाभ नगदी पिकांच्या वाढीव क्षेत्रासाठी झाला.

६) सेवा व उद्योग क्षेत्राचा वाढता विस्तार परिणामी लागवड योग्य, कोरडवाहू जमीन, सिमांत जमीन अकृषक कामासाठी वापरण्यासाठी होत आहे.

७) शहरीकरणाचे वाढते प्रमाण.

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad

८) निसर्गाच्या अनियमिततेचा परिणाम जास्त प्रमाणात अन्नधान्य उत्पादकावर झालेला दिसतो.

## संदर्भ


१) Sawant, Kulkarni, Chuthan, Satya Sai, Agriculture Development in Maharashtra Problems and prospects, National Bank for Agriculture and Rural Development, Mumbai, 1999.

२) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१७-१८.

३) महाराष्ट्राची पिकरचना, शोधगंगा, वेबसाईट.

४) पडोशी अनिल, शेती विकासाचे दोन उपाय : आधारभूत किंमत व घटक अनुदान अर्थसंवाद, एप्रिल/जून-२०१८.


Lecturer
Govt. College of Arts & Science
Aurangabad

PRINCIPAL
Govt. College of Arts & Science
Aurangabad